www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No. **A**

प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

# Paper-II

# HISTORY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

2. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

Seat No. | | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..........................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## MAR - 10223

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **36** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   - (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



# History
## Paper II
# इतिहास
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. ......................... is not a megalithic type.
   (A) Menhir
   (B) Dolmen
   (C) Topi-kund
   (D) Crain circle

2. ...................... excavation method is essential to employ to understand cultural sequence of ancient site.
   (A) Trial trench
   (B) Vertical
   (C) Quadrant method
   (D) Archaeological Sampling

3. Which of the following Harappan sites has yielded the remains of unique water management system including reservoir ?
   (A) Banawali
   (B) Dholavira
   (C) Surkotada
   (D) Kuntasi

1. .................. हा महापाषाणीय प्रकार नाही.
   (A) मेनहीर
   (B) डोलमेन
   (C) टोपी-कुंड
   (D) शिळावर्तुळ

2. प्राचीन स्थळाचा सांस्कृतिक कालक्रम जाणून घेण्यासाठी ................ उत्खनन पद्धतीचा अवलंब करणे क्रम प्राप्त ठरते.
   (A) चाचणी उत्खनन
   (B) उत्सेध उत्खनन
   (C) चतुर्थक उत्खनन
   (D) पुरातत्त्वीय नमुना-चाचणी

3. खालीलपैकी कोणत्या हडप्पा संस्कृतीच्या स्थळावरून तलावासहित अद्वितीय जलव्यवस्थापन पद्धतीचे अवशेष सापडले आहेत ?
   (A) बनावली
   (B) धोलावीरा
   (C) सुरकोटदा
   (D) कुंतासी

www.prepp.in



4. Remains of copper artefacts manufacturing workshop of the Harappan period are reported from ......................... .

(A) Lothal

(B) Kuntasi

(C) Surkotada

(D) Madina

5. The eastern limit of Indus civilization was ................... .

(A) Banawali

(B) Alamgirpur

(C) Ropar

(D) Chirand

6. Which of the following ports was called Poduke by the author of the Periplus of the Erythrean Sea ?

(A) Arikamedu

(B) Patala

(C) Barbaricum

(D) Sopara

4. हडप्पाकालीन ताम्र वस्तूंच्या उत्पादनाच्या कार्यशाळेचे अवशेष ................ या स्थळावरून सापडले आहेत.

(A) लोथल

(B) कुंतासी

(C) सुरकोटदा

(D) मदिना

5. .................... पूर्वेकडे सिंधू संस्कृतीची सीमा होती.

(A) बनावली

(B) आलमगीरपूर

(C) रोपड

(D) चिरंड

6. पेरिप्लस ऑफ द एरिथ्रिअन सीचा लेखक पुढीलपैकी कोणत्या बंदरास पोदुके म्हणतो ?

(A) अरिकमेडू

(B) पातला

(C) बारबारीकाम

(D) सोपारा

www.prepp.in



7. Muziris was an .................... .
   (A) Ancient technique of cloth making
   (B) Ancient string instrument
   (C) Ancient Port city
   (D) Ancient name for mix-metal

8. Which of the following famous Vedic scholars fixed the date of the Rigveda as 1500 BC to 1000 BC ?
   (A) Oldenburg
   (B) Max Muller
   (C) Jacobi
   (D) Winternitz

9. .................... is the earliest Buddhist cave site in India.
   (A) Bhaja
   (B) Karle
   (C) Kondane
   (D) Ajanta

7. मुझरीस हे एक ................ होय.
   (A) कापड उत्पादनाचे प्राचीन तंत्रज्ञान
   (B) प्राचीन तंतूवाद्य
   (C) प्राचीन बंदर
   (D) मिश्र धातूचे प्राचीन नाव

8. खालीलपैकी कोणत्या वैदिक अभ्यासकांने ऋग्वेदाची तारीख 1500 इ.स. पूर्व ते 1000 इ.स. पूर्व निश्चित केली ?
   (A) ओल्डेनबर्ग
   (B) मॅक्स म्युलर
   (C) जॅकोबी
   (D) विंटर्निट्झ

9. .................... लेणी समूह भारतातील प्राचीन बौद्ध लेणी समूह आहे.
   (A) भाजा
   (B) कार्ले
   (C) कोंडाणे
   (D) अजिंठा

www.prepp.in



10. ..................... script was not used to inscribe the Ashokan inscriptions.

(A) Brahmi

(B) Kharoshthi

(C) Greek

(D) Sharada

11. Which of the following is the Girnar rock edicts of the Mauryan emperor Ashoka mentions Cholas and Pandyas ?

(A) Second

(B) Third

(C) Fifth

(D) Seventh

12. Under the influence of which Buddhist monk did Ashoka become an ardent supporter of Buddhism ?

(A) Upagupta

(B) Upali

(C) Radhagupta

(D) Nagasena

10. अशोककालीन शिलालेख कोरण्यासाठी .............. लिपीचा वापर केला गेला नाही.

(A) ब्राह्मी

(B) खरोष्ठी

(C) ग्रीक

(D) शारदा

11. मौर्य सम्राट अशोक यांचे खालीलपैकी कोणत्या गिरनार शिलालेखात चोल आणि पांड्य यांचा उल्लेख आहे ?

(A) दुसरा

(B) तिसरा

(C) पाचवा

(D) सातवा

12. कोणत्या बौद्ध भिक्षूच्या प्रभावाखाली अशोक बौद्धधर्माचा उत्साही समर्थक बनला ?

(A) उपगुप्त

(B) उपाली

(C) राधागुप्त

(D) नागसेन

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



13. Match the texts in List I with the authors in List II :

**List I**

(*a*) Kalhana

(*b*) Shriharsha

(*c*) Soddhala

(*d*) Merutunga

**List II**

(1) *Udaya-sundari-katha*

(2) *Rajatarangini*

(3) *Prabandha Chintamani*

(4) *Naishadhiyacharita*

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (1) | (3) | (4) |
| (B) | (2) | (3) | (4) | (1) |
| (C) | (2) | (4) | (1) | (3) |
| (D) | (2) | (3) | (4) | (1) |

14. The following king was helpful in convening the first Buddhist Council at Rajagriha :

(A) Ashoka

(B) Chandragupta

(C) Bimbisar

(D) Ajatasatru

13. यादी क्रमांक I मधील ग्रंथांच्या जोड्या यादी क्रमांक II मधील लेखकांशी लावा :

**यादी I**

(*a*) कल्हाना

(*b*) श्रीहर्ष

(*c*) सोद्धला

(*d*) मेरूतुंगा

**यादी II**

(1) **उदयासंदुरीकथा**

(2) **राजतरंगिनी**

(3) **प्रबंध चिंतामणी**

(4) **नैषधीयचरित**

**कोड :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (1) | (3) | (4) |
| (B) | (2) | (3) | (4) | (1) |
| (C) | (2) | (4) | (1) | (3) |
| (D) | (2) | (3) | (4) | (1) |

14. खालीलपैकी कोणत्या शासकाने पहिल्या बौद्ध परिषदेच्या आयोजनात मदत केली ?

(A) अशोक

(B) चंद्रगुप्त

(C) बिंबिसार

(D) अजातशत्रू

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



15. Which of the following Satavahana kings had counterstruck the silver coins of the Western Kshatrapa ruler Nahapana ?
    (A) Gautamiputra Satakarni
    (B) Gautamiputra Siri Yajna Satakarni
    (C) Vasishthiputra Pulumavi
    (D) Skanda Siri Satakarni

16. The coins of the Kushana king .................... confirm Mahasen, Skandakumar and Vishakh as three separate deities.
    (A) Kanishka I
    (B) Vasudev I
    (C) Huvishka
    (D) Vasudev II

17. Mathura pillar inscription of Chandragupta II throws light on ...................... sect.
    (A) Pashupata
    (B) Kapalika I
    (C) Ajivika II
    (D) Bhagavata

15. खालीलपैकी कोणत्या सातवाहन राजाने पश्चिमी क्षत्रप शासक नहपान यांची चांदीची नाणी पुर्नटंकित केली होती ?
    (A) गौतमीपुत्र सातकर्णी
    (B) गौतमीपुत्र सिरी यज्ञ सातकर्णी
    (C) वासिष्ठीपुत्र पुळूमावी
    (D) स्कंद सिरी सातकर्णी

16. .................. या कुषाण राजाच्या नाण्यावरून महासेन, स्कंद कुमार आणि विशाखा ही वेगवेगळी देवता होती असे सिद्ध होते.
    (A) प्रथम कनिष्क
    (B) प्रथम वासुदेव
    (C) हुविष्क
    (D) द्वितीय वासुदेव

17. द्वितीय चंद्रगुप्त यांच्या मथुरा स्तंभलेखातून ................ या संप्रदायावर प्रकाश पडतो.
    (A) पाशुपत
    (B) कापालिक I
    (C) आजीविक II
    (D) भागवत

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



18. Which of the following Gupta kings had issued silver for the first time ?

(A) Chandragupta II

(B) Samudragupta

(C) Kumaragupta I

(D) Chandragupta I

19. The Besnagar pillar inscription of Heliodor mentions making of .......... .

(A) Garudadhvaja

(B) Vishnupada

(C) Simhadhvaja

(D) Ayagapatta

20. *Devi-Chandraguptam* was written by ................... .

(A) Vishakhadatta

(B) Shudraka

(C) Bharavi

(D) Banabhatta

18. खालीलपैकी कोणत्या गुप्त सम्राटाने सर्वप्रथम चांदीची नाणी काढली होती ?

(A) द्वितीय चंद्रगुप्त

(B) समुद्रगुप्त

(C) प्रथम कुमारगुप्त

(D) प्रथम चंद्रगुप्त

19. बेसनगर स्तंभलेखात .................... स्थापित केल्याचा उल्लेख आहे.

(A) गरुडध्वज

(B) विष्णूपाद

(C) सिंहध्वज

(D) आयागपट्ट

20. देवी-चंद्रगुप्तमची रचना खालीलपैकी कोणी केली ?

(A) विशाखादत्त

(B) शुद्रक

(C) भारावी

(D) बाणभट्ट

www.prepp.in



21. Which of the following sources does not help to reconstruct the historicity of the Gupta King Ramagupta ?

(A) Sanjan copper plate of Amoghavarsha I

(B) Durjanapur Jain image inscriptions

(C) Devichandraguptam

(D) Allahabad Pillar inscription of Samudragupta

22. The revenue taxes named Udranga and Uparika in Gupta times were levied on .................... .

(A) Quality of soil

(B) Crop pattern

(C) Available facility of irrigation

(D) Dimension of the land

23. Two seals of Nalanda mention 'Dharmadhikaran'. Dharmadhikaran was .................... .

(A) Revenue Court

(B) Criminal Court

(C) Family Court

(D) School of Judiciary Officials

21. खालीलपैकी कोणते साधन गुप्त राजा रामगुप्त याच्या ऐतिहासिकतेच्या पुनर्निर्मितीमध्ये साहाय्य करत नाही ?

(A) प्रथम अमोघवर्ष याचा संजाण ताम्रपट

(B) दुर्जनपूर जैन प्रतिमा लेख

(C) देवीचंद्रगुप्तम

(D) समुद्रगुप्त यांचा अलाहाबाद स्तंभलेख

22. उद्रंग आणि उपारिक हे गुप्तकालीन महसूलकर कशाच्या आधारे ठरवत होते ?

(A) जमिनीची गुणवत्ता

(B) पिकांचा प्रकार

(C) उपलब्ध सिंचनाची सोय

(D) जमिनीचे आकारमान

23. नालंदा मुद्रांवर 'धर्माधिकरण' असे नमूद केले आहे. धर्माधिकरण म्हणजे ................

(A) महसूल न्यायालय

(B) गुन्हे (फौजदारी) न्यायालय

(C) कुटुंब न्यायालय

(D) न्यायाधीशांचे प्रशिक्षण केंद्र

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



24. Which of the following is not depicted on the coins of Kushana King Kanishka I ?

(A) Nana

(B) Mao

(C) Mahasen

(D) Oesho

25. Which of the following mentions 'ma' and 'veli' as measure of land and Kalam as measure of grain ?

(A) Sangam literature

(B) Temple inscription of Pulakeshin II

(C) Vakataka copper plate

(D) Thirallaisthanam inscription

26. The presence of the *ayaka* pillars is one of the significant features of the Buddhist stupas of .................. region.

(A) Central India

(B) North India

(C) South India

(D) Western India

24. कुषाण सम्राट प्रथम कनिष्क यांच्या नाण्यावर खालीलपैकी कोणती प्रतिमा दर्शवली नाही ?

(A) नना

(B) माओ

(C) महासेन

(D) ओएशो

25. खालीलपैकी कोणत्या ठिकाणी संज्ञा 'मा' आणि 'वेली' यांचा वापर जमिनीचे मोजमाप आणि 'कलाम'चा वापर धान्य मोजण्यासाठी होत होता ?

(A) संगम वाङ्मय

(B) पुलकेशीन दुसरा याचा मंदिर अभिलेख

(C) वाकाटक ताम्रपट

(D) थिरल्लैस्थानम अभिलेख

26. आयक स्तंभांची उपस्थिती हे ..................... याप्रदेशातील बौद्ध स्तुपांचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

(A) मध्य भारत

(B) उत्तर भारत

(C) दक्षिण भारत

(D) पश्चिम भारत

27. Which of the following literary works of early medieval Bengal, tells us that more than fifty kinds of paddy were being cultivated that time ?

(A) Shivpurana

(B) Matsyapurana

(C) Shunyapurana

(D) Anupurana

28. Tamil inscriptions often have the word *nirāmbam*. To what does this refer ?

(A) Land revenue

(B) Peasant cultivators

(C) Irrigation systems

(D) Merchant guilds

29. Sallekhana means .................. .

(A) Religious practice of voluntarily fasting to death

(B) Religious ceremony for formal renunciation

(C) Religious ceremony for beginning of education

(D) Religious ceremony for the end of learning

27. खालीलपैकी कोणत्या पूर्वमध्ययुगीन बंगालमधील वाङ्मय-रचनेत असे नमूद केले आहे की तेव्हा पन्नासपेक्षा जास्त भाताचे प्रकार पिकविले जात होते ?

(A) शिवपुराण

(B) मत्स्यपुराण

(C) शुन्यपुराण

(D) अणुपुराण

28. तमिळ शिलालेखात नेहमी येणाऱ्या निरांबम् या शब्दाने कशाचा निर्देश होतो ?

(A) जमीन महसूल

(B) शेतकरी वर्ग

(C) जलसंधारण व्यवस्था

(D) व्यापारी श्रेणी

29. सल्लेखाना म्हणजे ....................

(A) मरेपर्यंत उपवास करण्याची एक धार्मिक पद्धत

(B) वैराग्य स्वीकारतांनाचा एक विधिवत धार्मिक समारंभ

(C) शिक्षण आरंभ करण्यासाठीचा एक धार्मिक समारंभ

(D) शिक्षण पूर्ण झाल्यावर करण्यासाठीचा एक धार्मिक समारंभ

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



30. The travelogue entitled, 'Foguoji' was written by ..................... .

(A) Hiuen Tsang

(B) Itsing

(C) Fa-hsien

(D) Taranath

31. According to which of the following early medieval linguist-grammarian is a city defined as a settlement surrounded by a wall and a moat, and marked by the prevalence of the laws and customs of the guilds of artisans and merchants ?

(A) Kaiyata

(B) Amalananda

(C) Prabhakara

(D) Kumarila Bhatta

32. Which of the following kings attacked the Rashtrakuta kingdom ?

(A) Mahipala of Kanauj

(B) Parantaka, the Chola king

(C) Upendra of Malwa

(D) Bhoja I, the Gurjara king

30. 'फोगुओजी' या प्रवासवर्णनाचे लेखण ......... ने केले आहे.

(A) ह्यूएन-त्सुंग

(B) ईत्सींग

(C) फाह्यान

(D) तारनाथ

31. खालीलपैकी कोणत्या पूर्वमध्ययुगीन काळातील व्याकरणकर्ता-भाषाशास्त्रज्ञाने शहराची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे—शहर म्हणजे अशी वस्ती जिच्या सभोवताली भिंत व खंदक असते आणि ही वस्ती कारागीर श्रेणी व व्यापारी वर्गांच्या श्रेणी संघांनी नियत केलेले कायदे व पारंपरिक अधिकारांचे पालन करत असते ?

(A) कैयाट

(B) अमलानंद

(C) प्रभाकर

(D) कुमारील भट्ट

32. खालीलपैकी कोणत्या राजाने राष्ट्रकूट राज्यांवर आक्रमण केले होते ?

(A) कन्नौजचा महिपाल

(B) चोल राजा परांतक

(C) माळव्यांचा उपेंद्र

(D) गुर्जर राजा भोज प्रथम

www.prepp.in



33. Cave 30 locally known as Chhota Kailas Cave at Ellora belongs to .................... .

(A) Shaivism

(B) Vaishanvism

(C) Jainism

(D) Buddhism

34. What was the *sabha* in Chola times ?

(A) An association of merchants

(B) The term used to denote the entire village

(C) The Brahman assembly

(D) The basic unit of administration

35. The ...................... was an important feature in the Virasaiva movement.

(A) *Vacanashastra*

(B) Jangama

(C) Family

(D) *Anubhava Mantapa*

33. छोटा कैलास नावाने ओळखली जाणारी लेणी क्रमांक 30 ............... याच्यांशी संबंधित आहे.

(A) शैवसंप्रदाय

(B) वैष्णवसंप्रदाय

(C) जैनधर्म

(D) बौद्धधर्म

34. चोलकाळात सभा काय होती ?

(A) एक व्यापारी संघटना

(B) पूर्ण गावासाठी वापरली जाणारी संज्ञा

(C) ब्राम्हण सभा

(D) प्रशासनाचा मूलभूत एकक

35. ................... हे वीरशैव चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये होते.

(A) वचनशास्त्र

(B) जंगम

(C) कुटुंब

(D) अनुभव मनटपा

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



36. Where is Virupaksha temple located ?

(A) Badami

(B) Alampur

(C) Pattadakal

(D) Aihole

37. Which of the following rulers took the titles of 'Abhinav-Bhoja' and 'Sakal-Kala-Bhoja' ?

(A) Raja Bhoja

(B) Pravarsena II

(C) Krishnadevaraya

(D) Kumargupta I

38. Manasollasa, a valuable source of socio-cultural information of 11th-12th century India was composed by the Kalyani Chalukya king named ........................ .

(A) Someshvara III

(B) Pulkeshin I

(C) Pulkeshin II

(D) Vikramaditya I

36. विरुपाक्ष मंदिर कुठे स्थित आहे ?

(A) बादामी

(B) आलमपूर

(C) पट्टडकल

(D) ऐहोळ

37. 'अभिनव-भोज' आणि 'सकल-काल-भोज' ही बिरुदे खालीलपैकी कोणत्या शासकाने घेतली होती ?

(A) राजा भोज

(B) प्रवरसेन दुसरा

(C) कृष्णदेवराय

(D) कुमारगुप्त पहिला

38. मानसोल्लास हे 11वे-12वे शतकातील भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक माहितीच्या दृष्टीने एक महत्त्वाचे स्रोत-साधन आहे. खालीलपैकी कोणत्या कल्याणी चालुक्य राजाने मानसोल्लासची रचना केली ?

(A) सोमेश्वर तिसरा

(B) पुलकेशीन पहिला

(C) पुलकेशीन दुसरा

(D) विक्रमादित्य पहिला

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



39. According to Isami's *Futuh us Salatin*, Malik Kafur was instructed by Alauddin Khilji to march into the Deccan and .................... .

(A) Destroy the Kakatiya power and establish Khilji rule

(B) Attack the Kakatiya capital and reinstate the king if he submitted

(C) Establish matrimonial alliances with the Deccani princely families

(D) Bypass the Kakatiyas and go straight to the Pandya kingdom of Madurai

40. In 1299, Alauddin Khilji undertook the first expedition to the region of ................. .

(A) Rajasthan

(B) Multan and Sindh

(C) Bengal

(D) Gujarat

39. इसामीच्या फुतुह उस सलातीन अनुसार अलाउद्दीन खिलजीने मलिक कफूरला दख्खनमध्ये स्वारी करून .................. चे निर्देश दिले होते.

(A) काकतिया सत्ता नष्ट करणे आणि खिलजी राज्य स्थापन करणे

(B) काकतिया राजधानीवर आक्रमण करणे आणि पराभव स्वीकारल्यास राजाला पुर्नस्थापना करणे

(C) दख्खन राज घराण्यातील विवाहसंबंध करार प्रस्थापित करणे

(D) काकतियाला टाकून सरळ मदुरईच्या पांड्य राज्याकडे जाणे

40. 1299 मध्ये .................. या भागात अलाउद्दीन खिलजीने पहिली मोहीम हाती घेतली.

(A) राजस्थान

(B) मुलतान आणि सिंध

(C) बंगाल

(D) गुजरात

41. According to Ibn Battuta, who was the *wali-ul-kharaj* ?

   (A) A Sufi pir to whom a grant of land was given

   (B) Officer in charge of justice

   (C) Officer in charge of a *qila*

   (D) Officer in charge of revenue administration

42. Who among the following kings sent a gift of a Kashmiri shawl to the Emperor of China ?

   (A) Bakhtiyar Khilji

   (B) Muhammad bin Tughlaq

   (C) Karikala Chola

   (D) Sikandar Lodi

43. The invasion of Timur marked :

   (A) The end of the effective control of the Delhi Sultanate outside its immediate neighbourhood

   (B) Mongol rule over India

   (C) The end of trade with Central Asia

   (D) Fragmentation of political systems across India

41. इब्नबतुता अनुसार वलि-उल-खराज कोण होता ?

   (A) सुफी पीर ज्याला जमिनीचा दान दिला गेला आहे

   (B) कायदा प्रभारी अधिकारी

   (C) किल्ला प्रभारी अधिकारी

   (D) महसूल प्रशासनाचा प्रभारी अधिकारी

42. पुढीलपैकी कोणत्या राजाने चीनच्या सम्राटला काश्मीरी शालची भेट वस्तू पाठवली होती ?

   (A) बखतियार खिलजी

   (B) मुहम्मद बिन तुघलक

   (C) करिकल चोला

   (D) सिकंदर लोदी

43. तैमूरच्या स्वारीमुळे पुढील गोष्ट घडली :

   (A) जवळपासचा प्रदेश सोडला तर दिल्ली सल्तनतीचा प्रभाव समाप्त झाला

   (B) मंगोलांची सत्ता भारतावर प्रस्थापित झाली

   (C) मध्य आशियासोबतचा व्यापार संपुटात आला

   (D) भारतभरातील राजकीय व्यवस्थांचे विखंडन झाले

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



44. The Sultan who called himself Naib-i-Khudai or deputy of the god, was :

(A) Alauddin Khilji

(B) Balban

(C) Ghiyasuddin Tughluq

(D) Firoz Tughluq

45. A description of the Sultanate of Ma'abar is given by ..................... .

(A) Shamsuddin Siraj Afif

(B) Nicolo Conti

(C) Marco Polo

(D) Chadrabhan Saxena

46. The *Ni'matnama*, a manuscript from Mandu, is a collection of ............ .

(A) Recipes

(B) Architectural monuments of Mandu

(C) A history of the siege of Mandu

(D) A history of the Faruqi kings

47. The Bahmani kingdom was divided into provinces which were known as .................. .

(A) *Shiq*

(B) *Hazari*

(C) *Sadi*

(D) *Iqlim*

44. ................ हा सुलतान स्वत:ला नाईब–इ–खुदाई किंवा देवाचा प्रतिनिधी म्हणून घेत असे.

(A) अलाउद्दीन खिलजी

(B) बलबन

(C) घियासउद्दीन तुघलक

(D) फिरोझ तुघलक

45. ................ याने मबारच्या सल्तनतचे वर्णन केले आहे.

(A) शमसुद्दीन सिराज अफिफ

(B) निकोलो कॉन्टी

(C) मार्को पोलो

(D) चंद्रभान सक्सेना

46. निमातनामा मांडूमधील एक पाण्डुलिपी हे ................ चा संग्रह आहे.

(A) पाककृती

(B) मांडू किल्यांतील स्थापत्य

(C) मांडूच्या वेढ्याचा इतिहास

(D) फारूकी राजांच्या इतिहास

47. बहामनी राज्य ज्या प्रांतात विभागले होते त्यांना ................ म्हणून ओळखले जाई.

(A) शिक

(B) हजारी

(C) सदि

(D) इकलिम

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



48. Sir Thomas Roe was sent as the English ambassador to the court of which Mughal Emperor ?

(A) Akbar

(B) Jahangir

(C) Shah Jahan

(D) Aurangzeb

49. Who among the following English travellers visited India during the reign of Akbar ?

(A) Nicolo Conti

(B) Ralph Fitch

(C) William Hedges

(D) William Hodges

50. The Mughal Empire in the 17th century had three recognised capitals. Which were they ?

(A) Delhi, Agra, Lahore

(B) Delhi, Agra, Surat

(C) Delhi, Agra, Burhanpur

(D) Delhi, Agra, Fatehpur Sikri

51. The first true arch in India is found in .................. .

(A) The tomb of Iltutmish

(B) The tomb of Balban

(C) The tomb of Ghiyasuddin Tughlaq

(D) The Dargah Sharif at Ajmer

48. सर थॉमस रो याला इंग्रजी राजदूत म्हणून कोणत्या मुघल सम्राटाच्या दरबारात पाठवण्यात आले ?

(A) अकबर

(B) जहागीर

(C) शाहजान

(D) औरंगजेब

49. खालीलपैकी कोणता इंग्रज प्रवासी अकबरांच्या काळात भारतात आला होता ?

(A) निकोलो कॉंटी

(B) राल्फ फिच

(C) विल्यम हेजेस

(D) विल्यम हॉजेस

50. 17व्या शतकातील मुघल साम्राज्यात तीन मान्यताप्राप्त राजधान्या होत्या. त्या कोणत्या ?

(A) दिल्ली, आग्रा, लाहोर

(B) दिल्ली, आग्रा, सूरत

(C) दिल्ली, आग्रा, बुऱ्हानपूर

(D) दिल्ली, आग्रा, फतेहपूर सिक्री

51. भारतातील पहिली खरी कमान ................ इथे सापडते.

(A) इल्तुतमिशची कबर

(B) बलबनची कबर

(C) घियासउद्दीन तुघलकची कबर

(D) अजमेरमधील दरगाह शरीफ

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



52. Bijapur and Golconda clashed over the possession of ................... .

(A) Cambay

(B) Naldurg

(C) Ahmedabad

(D) Cochin

53. In the Mughal administration, who was the *diwan-i-buyutat* ?

(A) Officer in charge of the expenditure of the mansabdars

(B) Officer in charge of the income from the *khalisa* land

(C) Officer in charge of cash salaries

(D) Officer concerned with the finances of the royal household, including the *karkhanas*

54. R.P. Tripathi has described the Mughal theory of kingship as .................... .

(A) Turko-Mongol theory of kingship

(B) Mongol theory of kingship

(C) Divinely appointed kingship

(D) Autocratic kingship

52. बिजापूर आणि गोलकोंडा यांनी ................ वर ताबा मिळविण्यासाठी संघर्ष केला.

(A) खंम्बाट

(B) नलदुर्ग

(C) अहमदाबाद

(D) कोचिन

53. मुघल प्रशासनात दिवान-इ-बयूतात कोण होता ?

(A) मनसबदारांचे खर्च बघणारा प्रभारी अधिकारी

(B) खालिसा जमिनीमधून येणाऱ्या उत्पन्नाचा प्रभारी अधिकारी

(C) रोख पगारीचा प्रभारी अधिकारी

(D) राजघराण्यात आणि कारखान्यांत वित्त बघणारा अधिकारी

54. आर.पी. त्रिपाठी यांनी मुघल राजपद सिद्धांताचे वर्णन ................ यात केले आहे.

(A) तुर्की-मंगोल राजपदाचे सिद्धांत

(B) मंगोल राजपदाचे सिद्धांत

(C) दैव नियुक्त राजपद

(D) हुकूमशाही राजपद

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



55. Which historian has said that Aurangzeb's failure against the Marathas was because of his "inability to comprehend the nature of the Maratha movement" ?

(A) Jadunath Sarkar

(B) G. S. Sardesai

(C) Satish Chandra

(D) Andre Wink

56. Jahandar Shah ascended the throne at .................. .

(A) Delhi

(B) Multan

(C) Lahore

(D) Agra

57. The first systematic biography of Chhatrapati Shivaji Maharaj was written by ................... .

(A) Cosmo de Guarda

(B) Krishnaji Anant Sabhasad

(C) Kavi Parmanand

(D) Gianbattista Careri

55. मराठ्या विरुद्ध औरंगजेबाचे अपयश हे मराठा चळवळीचे स्वरूप समजून घेण्यात औरंगजेबाची अक्षमता होती असे विधान कोणत्या इतिहासकराने केले आहे ?

(A) जदूनाथ सरकार

(B) गो. स. सरदेसाई

(C) सतीश चंद्र

(D) आंद्रे विंक

56. जहांदर शाह याने ................ येथे राज्यारोहण केले.

(A) दिल्ली

(B) मुलतान

(C) लाहोर

(D) आग्रा

57. छत्रपती शिवाजी महाराजांची पहिले पद्धतीशीर चरित्र ................ यांने लिहिले.

(A) कॉस्मो द गारदा

(B) कृष्णाजी आनंत सभासद

(C) कवी परमानंद

(D) ज्ञानबटीस्टा कॅरेरी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



58. What is meant by *khurd* and *budruk* ?

(A) They refer to the extended settlement of a village and the original one respectively

(B) They refer to the original and the extended settlement of a village respectively

(C) They refer to forms of proprietary holdings

(D) They refer to methods of collection of revenue

59. *Karuk* was a tax levied on ............ .

(A) Oilpressers

(B) Village artisans

(C) Village priests

(D) Merchants

60. The *hundi* was a ................. .

(A) Bill of exchange

(B) Promissory note

(C) A method for sending diamonds from the mines to the markets

(D) A mode of transport for bullion

58. खुर्द आणि बुद्रुक म्हणजे काय ?

(A) ते विस्तारित वसाहत आणि मूळ गाव संदर्भात अनुक्रमे वापरला जातो

(B) ते मूळ गांव आणि विस्तारित वसाहत संदर्भात अनुक्रमे वापरला जातो

(C) ते मालमत्ता धारण प्रकारांच्या संदर्भात वापरला जातो

(D) ते महसूल गोळा करण्याच्या पद्धतीशी संदर्भात आहे

59. कारूक हा कर ................ वर लागू होता.

(A) तेली

(B) गावातील कारागीर

(C) गावातील याजक

(D) व्यापारी

60. हुंडी एक ................ होता.

(A) देवाणघेवाणचा देयक

(B) वचनीय चिठ्ठी

(C) खानीतून बाजारपेठेत पाठवण्याची पद्धत

(D) सोने-चांदी लगदीच्या वाहतुकीचे माध्यम

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



61. .................. was a loan for extending and improving agriculture in Medieval North India.
(A) *Taqavi*
(B) *Pat*
(C) *Talpat*
(D) *Sondhar*

62. The Sardesai of Kudal was accused of attacking and robbing Portuguese vessels at sea in :
(A) 1726
(B) 1728
(C) 1761
(D) 1763

63. What is meant by *paimaish* ?
(A) Amount of revenue collected
(B) Method of revenue collection
(C) Assessment of revenue based on measurement
(D) Revenue collected through tolls and taxes

64. What are the *Geniza* documents ?
(A) Documents giving information on Jewish trade to Europe
(B) Documents about the India trade of Jewish merchants from Cairo
(C) Documents regarding land revenue
(D) Documents on collection of customs duties at Surat and Cambay

61. मध्ययुगीन उत्तर भारतात शेती वाढविण्यासाठी आणि सुधारण्यासाठी ................ हे कर्ज दिले जात असे.
(A) तकावी
(B) पट
(C) तलपट
(D) सोनधर

62. ................ मध्ये कुडाळच्या सरदेसायावर पोर्तुगीजांच्या समुद्रातील जहाजांवर हल्ला करून ती लुटल्याचा आरोप केला गेला.
(A) 1726
(B) 1728
(C) 1761
(D) 1763

63. पैमाश म्हणजे काय ?
(A) महसूलची जमा रक्कम
(B) महसूल गोळा करण्याची पद्धत
(C) मोजणीवर आधारित महसुलीचे मूल्यांकन
(D) जकात व कर यातून जमा केलेला महसूल

64. गेनिजा कागदपत्रे काय आहेत ?
(A) युरोपशी होणाऱ्या यहुदी व्यापाराची माहिती देणारी कागदपत्रे
(B) कैरो येथून होणाऱ्या यहुदी व्यापाऱ्याच्या भारतीय व्यापारसंबंधीची कागदपत्रे
(C) जमीन महसूल संबंधित कागदपत्रे
(D) सूरत आणि कॅम्बे येथे जमा केल्या जाणाऱ्या सीमा शुल्कासंबंधीची कागदपत्रे

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



65. Which of the following is *not* regarded as a feature of Indian feudalism ?

(A) Forced labour was widely prevalent

(B) The number of share croppers increased

(C) Extra economic coercion was exercised by military land-holders

(D) The village economy was relatively closed

66. Who was the Zamorin ?

(A) The ruler of Malindi in Africa

(B) The ruler of the Calicut

(C) The ruler of the Madurai kingdom

(D) The deputy of the Bijapur Sultan in Goa

67. The ports of Thatta and Lahiri Bandar are located on :

(A) The Indus River

(B) The Beas River

(C) The Chenab River

(D) The Sutlej River

65. खालीलपैकी कोणते भारतीय सामंतवादाचे वैशिष्ट्ये नव्हते ?

(A) वेठ बेगारी व्यापक प्रमाणात प्रचलित होती

(B) खंडकरीची संख्या वाढली

(C) लष्करी जमीन धारकांकडून जबरदस्तीने अतिरिक्त आर्थिक भार लादला जाई

(D) गावाची अर्थव्यवस्था ही तुलनेने बंद होती

66. झामोरिन कोण होता ?

(A) आफ्रिकेतील मलिंडीचा राजा

(B) कॅलिकटचा राजा

(C) मदुरई राज्याचा राजा

(D) गोव्यात विजापूर सुलतानचा प्रतिनिधी

67. थट्टा आणि लाहिरीचे बंदर ................ येथे आहे.

(A) सिंधू नदी

(B) बियास नदी

(C) चिनाब नदी

(D) सतलज नदी

www.prepp.in



68. By which treaty did the Peshwa Bajirao II accept the Subsidiary alliance ?

(A) Bassein (Vasai)

(B) Hyderabad

(C) Rakshastagdi

(D) Poona

69. In the 18th century, certain 'new states' came up in protest against the Mughals. Which of the following was *not* a new state ?

(A) The Jats

(B) Bengal

(C) Punjab

(D) The Marathas

70. ..................... undertook the earliest systematic study of Indian architecture.

(A) Alexander Cunningham

(B) E. Schultz

(C) James Fergusson

(D) Percy Brown

68. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी कोणत्या तहाद्वारे तैनाती फौज मान्य केली ?

(A) वसई

(B) हैदराबाद

(C) राक्षसतागडी

(D) पुणे

69. अठराव्या शतकात मुघलांच्या विरोधात काही नवीन राज्य पुढे आले. खालीलपैकी कोणते नवीन राज्य नव्हते ?

(A) जाट

(B) बंगाल

(C) पंजाब

(D) मराठा

70. ................ ने भारतीय स्थापत्याचा सर्वात प्रथम पद्धतीशीर अभ्यास केला.

(A) अलेक्झांडर कनिंगहॅम

(B) इ. शूल्टस

(C) जेम्स फर्ग्यूसन

(D) परसी ब्राऊन

www.prepp.in



71. Which of the following was *not* a base of the Portuguese in India ?

(A) Nagapattinam

(B) San Thomé

(C) Masulipatnam

(D) Cochin

72. Who among the following historians has used the phrase, 'Vasco da Gama age' ?

(A) Radhakumud Mookherji

(B) B. A. Saletore

(C) Sanjay Subrahmanyam

(D) K. M. Panikkar

73. The author of Mirat-ul-Akhbar was :

(A) Rajaram Mohan Roy

(B) M. N. Roy

(C) Swami Dayanad Saraswati

(D) Aurobindo Ghosh

71. खालीलपैकी कोणता भारतात पोर्तुगीजांचा तळ नव्हता ?

(A) नागापट्टीनम

(B) सॅन थोमे

(C) मसुलिपटनम्

(D) कोचीन

72. पुढीलपैकी कोणत्या इतिहासकारांने 'वास्को द गामा युग' असा वाक्यप्रकार वापरला आहे ?

(A) राधाकुमुद मुखर्जी

(B) बी.ए. सालेतोर

(C) संजय सुब्रहमण्यम्

(D) के. एम. पाणिक्कर

73. मीरात-उल-अखबारचे लेखक कोण होते ?

(A) राजाराम मोहन रॉय

(B) एम. एन. रॉय

(C) स्वामी दयानंद सरस्वती

(D) अरविंद घोष

www.prepp.in



74. This civil servant who later became the Governor of Bombay did not approve of Lord Dalhousie's policy of annexation.

(A) Sir George Russel Clerk

(B) Colonel Stewart

(C) Sir Hugh Rose

(D) Major Ellis

75. In 1845, the British purchased this Danish Fort in India :

(A) Pondicherry

(B) Dansborg

(C) Kronborg

(D) Fort St George

76. Who stated that "The event of 1857 started as a religious movement but ended as a people's movement" ?

(A) Dr. R. C. Majumdar

(B) Dr. S. N. Sen

(C) Ashok Mehta

(D) Ganesh Savarkar

74. या सनदी अधिकाऱ्याला लॉर्ड डलहौसीचे खालसा धोरण पसंत नव्हते आणि तो नंतर मुंबई प्रांताचा गव्हर्नर झाला.

(A) सर जॉर्ज रसेल क्लर्क

(B) कर्नल स्ट्यूअर्ट

(C) सर ह्यू रोझ

(D) मेजर एलिस

75. 1845 मध्ये इंग्रजांनी डेनिशांकडून भारतातील हा किल्ला विकत घेतला :

(A) पाँडिचेरी

(B) दान्सबोर्ग

(C) क्रोनबोर्ग

(D) फोर्ट सेंट जॉर्ज

76. "1857 ची घटना धार्मिक चळवळ म्हणून सुरू झाली पण लोकांची चळवळ म्हणून शेवट झाला" असे विधान कोणी केले ?

(A) डॉ. आर. सी. मजुमदार

(B) डॉ. एस. एन. सेन

(C) अशोक मेहता

(D) गणेश सावरकर

www.prepp.in



77. In 1870, the London Times reported that .................. organised a public meeting in Bombay to protest against the rise in Income Tax.

(A) Poona Sarvajanik Sabha

(B) East India Association

(C) Bombay Association

(D) Madras Mahajan Sabha

78. Who was the chief advisor and confidant of Syed Ahmed Khan ?

(A) W.W. Hunter

(B) Theodore Beck

(C) Theodore Morison

(D) Nassan Lees

79. Who said, "I learnt my first lessons in politics at the feet of Surendra-nath Banerjee" ?

(A) Motilal Nehru

(B) M. K. Gandhi

(C) M. A. Jinnah

(D) B. G. Tilak

77. 1870 मध्ये लंडन टाइम्सने बातमी दिली होती की ................ या संस्थेने मुंबईत आयकर वाढीच्या विरोधात जाहीरसभा आयोजित केली होती.

(A) पुणे सार्वजनिक सभा

(B) ईस्ट इंडिया असोसिएशन

(C) बॉम्बे असोसिएशन

(D) मद्रास महाजन सभा

78. सर सय्यद अहमद खानचा प्रमुख सल्लागार आणि विश्वासू कोण होता ?

(A) डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर

(B) थिओडोर बेक

(C) थिओडोर मॉरिसन

(D) नासान लीस

79. ''सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या पायाशी बसून मी राजकारणातील पहिले धडे शिकलो'' असे कोणी म्हटले होते ?

(A) मोतीलाल नेहरू

(B) एम.के. गांधी

(C) एम.ए. जीन्नाह

(D) बी.जी. टिळक

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



80. The founder President of the Harijan Sevak Sangh founded by Mahatma Gandhi was :

(A) Mahadev Desai

(B) G.D. Birla

(C) Amritlal Thakkar

(D) Vallabhbhai Patel

81. The Kuka Movement finally turned into the movement for ................ .

(A) The establishment of Hindu-Sikh unity

(B) The Reformation of the Sikh religion

(C) The ouster of the British from Punjab

(D) Saving the tenants from exploitation by landlords

82. Balaji Prabhakar Modak organised Science exhibitions with the support of ...................... in 1887 and 1897, which were visited by thousands of people.

(A) Kolhapur State

(B) Baroda State

(C) Gwalior State

(D) Indore State

80. महात्मा गांधींनी स्थापन केलेल्या हरिजन सेवक संघाचे संस्थापक अध्यक्ष ................ होते.

(A) महादेव देसाई

(B) जी.डी. बिर्ला

(C) अमृतलाल ठक्कर

(D) वल्लभभाई पटेल

81. कूका चळवळीचे अंतिम रूपांतर ................ चळवळीसाठी झाले.

(A) हिंदू-शीख ऐक्य स्थापनेसाठी

(B) शीख धर्म सुधारणा

(C) पंजाबमधून ब्रिटिशांना बाहेर काढण्यासाठी

(D) किरायेदारांना जमीनदारांच्या शोषणापासून मुक्ती मिळण्यासाठी

82. बाळाजी प्रभाकर मोडक यांनी ................ च्या मदतीने 1887 आणि 1897 मध्ये भरवलेल्या विज्ञान प्रदर्शनांना हजारो लोकांनी भेट दिली.

(A) कोल्हापूर संस्थान

(B) बडोदा संस्थान

(C) ग्वाहेर संस्थान

(D) इंदोर संस्थान

www.prepp.in



83. The First Director General of the Archaeological Survey of India was .................... .

(A) Alexander Cunningham

(B) Grant Duff

(C) Max Mueller

(D) Sir P. J. Marshal

84. This native colonial official wrote a book describing the village social structure in Maharashtra :

(A) T. N. Atre

(B) Setu Madhavrao Pagdi

(C) T. Madhavrao

(D) D. B. Parasnis

85. The National Anthem 'Jana-gana-mana' was first sung in Dec. 1911 at which session of the Congress ?

(A) Allahabad Session

(B) Madras Session

(C) Bombay Session

(D) Calcutta Session

83. आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे पहिले महासंचालक कोण होते ?

(A) अलेक्झांडर कनिंगहम

(B) ग्रँट डफ

(C) मॅक्स म्यूलर

(D) सर पी. जे. मार्शल

84. या वसाहतकालीन भारतीय अधिकाऱ्याने महाराष्ट्रातील सामाजिक संरचनेचे वर्णन करणारे पुस्तक लिहिले :

(A) त्रि. ना. आत्रे

(B) सेतु माधवराव पगडी

(C) टी. माधवराव

(D) द.ब. पारसनीस

85. डिसेंबर 1911 मध्ये काँग्रेसच्या कोणत्या अधिवेशनात 'जन गण मन' हे राष्ट्रगीत प्रथम गायले होते ?

(A) अलाहाबाद अधिवेशन

(B) मद्रास अधिवेशन

(C) मुंबई अधिवेशन

(D) कलकत्ता अधिवेशन

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



86. Which one of the following leaders initially led the Dharasna Satyagraha along with Kasturba Gandhi ?

(A) Sardar Patel

(B) Sarojini Naidu

(C) Maulana Azad

(D) Abbas Tyabji

87. In 1929, which party was formed by Akram Khan, Fazl ul Haq and Abdur Rahim to protect the interests of the Bargadars who were rent farmers in Bengal ?

(A) Unionist Party

(B) Jotedar Party

(C) Riyasati Praja Mandal

(D) Bengal Kisan Sabha

88. Which of the following was *not* a part of the Non-cooperation Movement ?

(A) Boycott of Courts

(B) Boycott of government schools

(C) Boycott of foreign cloth

(D) Boycott of tax payment

86. खालीलपैकी कोणत्या नेत्यांने कस्तुरबा गांधीबरोबर सुरुवातीला धारासना सत्याग्रहाचे नेतृत्व केले होते ?

(A) सरदार पटेल

(B) सरोजिनी नायडू

(C) मौलाना आझाद

(D) अब्बास तैयब्जी

87. 1929 साली बंगालमध्ये अक्रम खान, फझल उल हक आणि अबदुर रहीम यांनी खंडाने शेती करणाऱ्या बरगादारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कोणता पक्ष स्थापन केला ?

(A) यूनिअनिस्ट पार्टी

(B) जोतेदार पार्टी

(C) रियासती प्रजा मंडल

(D) बेंगाल किसान सभा

88. खालीलपैकी कोणती बाब असहकार चळवळीचा भाग नव्हती ?

(A) न्यायालयांवर बहिष्कार

(B) सरकारी शाळांवर बहिष्कार

(C) परदेशी कापडावर बहिष्कार

(D) करभरण्यावर बहिष्कार

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



89. 'Revolution and Counter-revolution in Ancient India' was authored by ..................... .

(A) Barrister Mohd. Ali Jinnah

(B) Barrister M. K. Gandhi

(C) Barrister M. R. Jaykar

(D) Barrister B. R. Ambedkar

90. Who among the following Indian freedom fighters made an attempt to estimate the per capita income of India ?

(A) Gopal Krishna Gokhale

(B) Firoz Shah Mehta

(C) Surendranath Banerjee

(D) Dadabhai Naoroji

91. "Sacred Books of the East" was a series of translations of Asian Religious Texts edited by .............. .

(A) Georg Bühler

(B) Max Mueller

(C) Keith and McDonell

(D) William Jones

89. 'प्राचीन भारतातील क्रांती आणि प्रतिक्रांती' या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) बॅरिस्टर मोहम्मद अली जीन्नाह

(B) बॅरिस्टर मो. क. गांधी

(C) बॅरिस्टर मु. रा. जयकर

(D) बॅरिस्टर भी. रा. आंबेडकर

90. खालीलपैकी कोणत्या भारतीय स्वातंत्र्य सैनिकाने भारताच्या दरडोई उत्पन्न काढण्याचा प्रयत्न केला होता ?

(A) गोपाळकृष्ण गोखले

(B) फिरोजशाह मेहता

(C) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

(D) दादाभाई नौरोजी

91. ''सेक्रेड बुक्स ऑफ द ईस्ट'' हा आशियातील धार्मिक ग्रंथांच्या भाषांतराच्या खंडांचा संग्रह होता. त्याचे संपादक .................. हे होते.

(A) गेऑर्ग ब्यूहलर

(B) मॅक्स म्यूलर

(C) कीथ व मॅकडॉनेल

(D) विल्यम जोन्स

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



92. Who among the following was the first to donate his land under the Bhoodan Movement ?

(A) Jagmohan Reddy

(B) R. Raman

(C) Ramchandra Reddy

(D) Y. V. Reddy

93. Who among the following supported the Tibetan theory about the original home of the Aryans ?

(A) Swami Vivekananda

(B) Shri Ganga Nath Jha

(C) Swami Dayanand

(D) Bal Gangadhar Tilak

94. Which of the following is a distinctive feature of the segmentary state model ?

(A) It challenged the unitary model of state formation

(B) It is based on the theory of open village communities

(C) It is primarily concerned with the emergence of the temple as an institution

(D) It is based on the theory of Max Weber

92. खालीलपैकी कोणी पहिल्यांदा भूदान चळवळी अंतर्गत आपली जमीन दान केली ?

(A) जगमोहन रेड्डी

(B) आर. रामन

(C) रामचंद्र रेड्डी

(D) वाय. व्ही. रेड्डी

93. तिबेट हे आर्य लोकांचे मूळ ठिकाण होते, या सिद्धांताशी पुढीलपैकी कोणी समर्थन केले आहे ?

(A) स्वामी विवेकानंद

(B) श्री गंगानाथ झा

(C) स्वामी दयानंद

(D) बाळ गंगाधर टिळक

94. खालीलपैकी कोणते विभाजित राज्य नमुन्याचे विशिष्ट वैशिष्ट्य होते ?

(A) एकाकी राज्यनिर्मितीच्या नमुन्यास आव्हान दिले

(B) ते खुल्या गावगाड्याच्या सिद्धांतावर आधारित आहे

(C) मंदिराचा एका संस्थेत म्हणून उदय होण्याशी प्रामुख्याने संबंधित आहे

(D) ते मॅक्स वेबरच्या सिद्धांतावर आधारित आहे

www.prepp.in



95. The style of nostalgic painting by European artists in India like William Hodges in the 18th century is known as ..................... .

(A) Picturesque

(B) Romantic

(C) Oriental

(D) Colonial

96. The term 'gunpowder empires' was first used by ..................... .

(A) Douglas E. Streusand

(B) Philip Curtin

(C) K. N. Chaudhuri

(D) Marshall Hodgson

97. Which of the following can be found in the Surat Factory Records ?

(A) India House Correspondence

(B) Inam Commission Documents

(C) Fort William Correspondence

(D) Inward and Outward Books

95. 18व्या शतकात विलियम हॉजेससारख्या युरोपियन चित्रकारांनी स्मरणीय शैलीत केलेल्या चित्रकलेला ................. असे म्हटले जाते.

(A) सुरम्य

(B) अद्‌भुत रम्य

(C) पौरात्य

(D) वसाहतिक

96. 'दारूगोळा साम्राज्य' ही संज्ञा ................. यांनी पहिल्यांदा वापरली.

(A) डगलस इ. स्ट्रिउसंड

(B) फिलिप कर्टन

(C) के. एन. चौधरी

(D) मार्शल हॉजसन

97. सूरत फॅक्टरी रेकॉर्डस् यामध्ये पुढीलपैकी काय आढळते ?

(A) इंडिया हाउस पत्रव्यवहार

(B) इनाम कमिशन कागदपत्रे

(C) फोर्ट विल्यम पत्रव्यवहार

(D) इनवर्ड व आउटवर्ड पुस्तक

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



98. In 1640, the English were given a grant of land which became their first fort in India. Which place was given to them ?
   (A) Madras/Chennai
   (B) Calcutta/Kolkata
   (C) Bombay/Mumbai
   (D) Rajapur

99. Who was the *nakhoda* mentioned in European sources ?
   (A) The pilot of a ship
   (B) The commander of the fleet
   (C) The chief warehouse keeper
   (D) The person who collected the bullion to be minted

100. Who among the following historians has said that the 'crisis of the jagirdari system' was the main cause of the decline of the Mughal Empire ?
   (A) Irfan Habib
   (B) M. Athar Ali
   (C) Satish Chandra
   (D) Muzaffar Alam

98. 1640 मध्ये इंग्रजांना एक जमिनीची देणगी देण्यात आली जो भारतातील त्यांचा पहिला किल्ला बनला. त्याला कोणती जागा दिलेली होती ?
   (A) मद्रास/चेन्नई
   (B) कलकत्ता/कोलकाता
   (C) बॉम्बे/मुंबई
   (D) राजापूर

99. युरोपियन साधनात उल्लेखलेला नखोडा कोण होता ?
   (A) जहाजाचा कप्तान
   (B) बोटींच्या ताफ्याचा कमांडर (अधिकारी)
   (C) बखरीचा प्रमुख अधिकारी
   (D) चलन बनवण्यासाठी सोने-चांदीची लगदी गोळा करणारा व्यक्ती

100. जागीरदारी पद्धतीतील पेचप्रसंग हा मुघल सत्तेच्या ऱ्हासांचा प्रमुख कारण होता. असे विधान पुढीलपैकी कोणत्या इतिहासकारांने केले ?
   (A) इरफान हबीब
   (B) एम. अथर अली
   (C) सतीश चंद्र
   (D) मुजफ्फर आलम

www.prepp.in



## ROUGH WORK

Your Personal Exam Guide